# मेट्रो ३च्या पाच पॅकेजमधील ९३ टक्के भुयारीकरण पूर्ण



**मुंबई** : कुलाबा-वांद्रे-सिप्झ या ३३.५ किमी असलेल्या तिसऱ्या भुयारी मेट्रो मार्गिकेच्या ५ पॅकेजमधील ९३ टक्के भुयारीकरण पूर्ण झाले असून, काही मेट्रो स्थानकांच्या उभारणीचे काम प्रगतीपथावर आहे.

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या माध्यमातून मेट्रो ३ मार्गिकेच्या परिसराची विभागणी ७ पॅकेजमध्ये करण्यात आली असून, सुमारे ५०.३ किमी भुयारीकरण पूर्ण करण्यात आले आहे. पॅकेज २, ४, ५, ६ आणि ७ यांचे भुयारीकरण पूर्ण करण्यात येत असून, आता सिप्झ ते वरळी विज्ञान केंद्रापर्यंतचे भुयार हे जुळ्या बोगद्यांनी जोडले जाणार आहे. या दोन्ही बोगद्यांची लांबी १८.५ किमी आहे. पूर्ण केलेल्या भुयारी कामाच्या टप्प्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, दादर, धारावी, वांद्रे-कुर्ला संकुल, छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि एमआयडीसी परिसर जोडण्यात येणार आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाची मदत घेत आणि कुशल कामगारांच्या कौशल्यानेच कोणताही अपघात न होता भुयारीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले आहे. संपूर्ण मार्गिकेच्या १०० टक्के भुयारीकरणानंतर प्रकल्पातील मेट्रो स्थानकांची उभारणी, सिव्हिल वर्क यांचे काम वेग घेणार असून, डिसेंबरपर्यंत चाचणी सुरू करण्याचा एमएमआरसीएलचा मानस आहे.